Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

Chief Editor

Mr. Arun B. Godam

Shaurya Publication , Latur

16. लोकशाहीतील नैतिकता 54
प्रा. डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे
17. लोकशाहीचे सामाजिक आधार आणि आव्हाणे. 57
डॉ. विलास सोमाजी पवार
18. आव्हानाच्या विळख्यातील भारतीय लोकशाही 60
प्रा.चंद्रकांत एन. पुरी
19. भारतांतील दारीद्रय : लोकशाहीसमोरील आव्हान 63
सुदर्शन उत्तमराव ढाले
20. "भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या आणि आव्हाने" 67
प्रा.डॉ. जी.डी. घोडे
21. "भारतीय लोकशाही समोरील समकालीन आव्हाने आणि उपाययोजना" 69
प्रा.डॉ.सतिष मैलारी कटके
22. भारतीय लोकशाहीची तत्त्वे : यश आणि अपयश 72
डॉ. डी.के. खोकले
23. लोकशाहतील प्रसार माध्यमांची भूमिका व महत्व 76
डॉ. विकास बी चांदजकर
24. निवडणुक व्यवस्थेतील सुधारणा : भूतकाळ आणि भविष्य काळाचा आढावा 78
प्रा.डॉ.भालेराव सुधाकर नारायण
25. प्रादेशिकवाद 82
प्राचार्य डॉ. , तळणीकर एस.जी.
26. भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या आणि आव्हाने 88
प्रा.डॉ.सचिन रामराव काळबांडे
27. भारतीय लोकशाही समोरील समस्या आणि आव्हाने 91
प्रा. गुरुनाथ मावंजी घुटे
28. राजकारणाचे गुन्हेगारीकरण: भारतीय लोकशाहीपुढील एक आव्हान 94
प्रा. डॉ. बालासाहेब जी. जोगदंड
29. शाश्वत विकासासाठी पर्यावरणाची आवश्यकता : एक राजकीय अध्ययन 100
प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा
30. 'संत साहित्यातील लोकशाही मुल्य' 103
डॉ.श्रीराम मारोतराव कऱ्हाळे
31. भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार : एक आव्हान 105
डॉ. चांगदेव निवृती मुंढे

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 60 : Vol. 1
Oct. 2022
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

लोकशाहीतील प्रसार माध्यमांची भूमिका व महत्त्व

डॉ. विकास श्री. चवरेकर
विभाग प्रमुख राज्यशास्त्र
मातोश्री सांताबाई मोरे महाविद्यालय वालिव

सारांश:

प्रसारमाध्यम हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन ओळखला जातो. भारतात या स्तंभाने स्थान अबाधित आहे. समाजाच्या माध्यमांकडून असलेल्या अपेक्षा आजही किंचित आहेत. लोकशाहीच्या बळकटीसाठी माध्यमांनी विश्वासार्हता जपली पाहिजे. हे समाजभान राखले तर माध्यमांचे समाजातील स्थान अधिक बळकट होईल.

माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. हे जगभरातील लोकशाही देशांनी स्वीकारलेले वास्तव आहे. लिखलेल्या संविधान या संकल्पनेचा कणा असलेले संसद, प्रशासन, न्यायसंस्था आणि प्रसारमाध्यमे या चार स्तंभांपैकी एक स्तंभ जरी खिळखिळा झाला, तरी लोकशाही दुबळी होईल, असे मानले जाते. त्यातही माध्यमे हा स्तंभ अधिक मजबूत असला पाहिजे, असे लोकशाही व्यवस्था मानते. कारण लोकशाहीचे पहिले तीन स्तंभ आणि समाज यांच्यातील दुवा म्हणुन महत्त्वाची भूमिका बजावण्याची मोठी जबाबदारी माध्यमांवर असते. देशातील वा जगभरातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि समाजजीवनाशी निगडित असलेल्या प्रत्येक घडामोडीचे भान समाजास देण्याची जबाबदारी माध्यमांवर असते, आणि ही जबाबदारी निभावणे हे सत्य आहे, हे माध्यमांनी स्वतःहून मान्य केले असेल, तर जे काही समाजापर्यंत पोहोचवायचे असते, ते निष्कलंकपणे व जसे आहे तसे, त्याला कोणताही रंग न लावता पोहोचविणे हे माध्यमांचे कर्तव्य ठरते. समाजमाध्यमांच्या फोफावत्या प्रसारात मुद्रित माध्यमांना किंवा दूरचित्रवाणी-रेडिओसारख्या माध्यमांना या जबाबदारीचे भान ठेवावे लागते. कारण, समाजमाध्यमांचा विस्तार होत असतानाही या माध्यमांकडून माहितीच्या पारदर्शक प्रसारणाची समाजाची अपेक्षा अधिक आहे. अर्थात, केवळ जसे आहे तसे वाचकापर्यंत पोहोचविण्याच्या भूमिकेबरोबर, समाजाला विचार देण्याची जबाबदारीही माध्यमांची असल्याने, ती निभावताना अधिक संयमही राखणे गरजेचे असते. कारण, माध्यमे हे दुधारी हत्यार आहे. माध्यमे विकासास हातभार लावणारी भूमिका निभावू सकतात, आणि विनाशाची बीजेही पेरू सकतात. पत्रकारिता हे सत मानणाऱ्या माध्यमांनी, समाजास भूमिका घेण्यासाठी मार्गदर्शन करताना या दुधारीपणाची जाणीव ठेवणेही विशेषत्वाने आवश्यक आहे.

प्रस्तावना-

माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असला, तरी अलीकडे मध्याने विस्तारत असलेल्या समाजमाध्यमांना या जबाबदारीचे पुरेसे भान देणे गरजेचे आहे. समाजमाध्यमांचा समाजविघातक कामांसाठी गैरवापर होत असल्याच्या असंख्य बातम्या माध्यमांतूनच समाजापर्यंत पोहोचत असतात. दहशतवादी कारवाया करणारे गट समाजमाध्यमांचा वापर करत असल्याची कबुली केंद्र सरकारनेच दिली आहे. अफवा पसरविणे किंवा गैरमार्ग पसरवून समाजस्वास्थ्य बिघडविणे अशी कृत्ये समाजमाध्यमांतूनच होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. याला आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्याचे आदेश केंद्र सरकार राज्यांना वारंवार देत असते. अशा कारवाया झाल्या, की सगळा समाजाने व माध्यमांनी सरकारच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका घेण्याची आवश्यकता असते. समाजमाध्यमे ही संघर्षाची साधने न होता संवादाची, सौहार्दाची साधने म्हणून वापरली जावी, तर माध्यमांविषयी समाजाकडून असलेल्या अपेक्षांना बळकटी येईल व लोकशाही व्यवस्थेचा चौथा स्तंभ म्हणून ज्या जबाबदाऱ्या माध्यमांवर असतात, त्यांचे पालन केल्याचे पुण्य माध्यमांना प्राप्त होईल.

प्रसार माध्यमाची भूमिका आणि महत्व –

मार्च 2018 मध्ये लोकसभेत सरकारतर्फे एक माहिती देण्यात आली. देशभरातील प्रादेशिक वृत्तपत्रांची किंवा प्रकाशनांची संख्या वाढत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले. सन 2015मध्ये देशात एक लाख पाच हजार 448 प्रादेशिक प्रकाशने होती. 2016मध्ये ही संख्या एक लाख 10 हजार 851 एवढी, म्हणजे 4.87 टक्क्यांनी वाढली, तर 2017मध्ये एक लाख 14 हजार 820 एवढी प्रादेशिक प्रकाशने होती. समाजाच्या माध्यमांकडून असलेल्या अपेक्षा आजही उंचावलेल्याच आहेत, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. 2017मध्ये प्रादेशिक प्रकाशनांच्या संख्येत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर होता. देशातील सर्वाधिक - म्हणजे 17 हजार 736 प्रकाशने उत्तर प्रदेशात, तर त्याखालोखाल 15 हजार 673 प्रादेशिक प्रकाशने महाराष्ट्रातून प्रसिद्ध होत होती. समाजमाध्यमांचा प्रसार वाढत असताना, दूरचित्रवाणी माध्यमे काना-कोपऱ्यापर्यंत पोहोचत असतानाही, मुद्रित माध्यमे समाजात मूळ टिकून आहेत, असेच या आकडेवारीवरून स्पष्ट होते. म्हणजेच, समाजाच्या माध्यमांकडून असलेल्या अपेक्षा आजही किंचित आहेत. माध्यमांवरील समाजाचा विश्वास आजही कायम आहे. अधूनमधून दारुण संशयाचे हल्ले वाढूनही लोकशाहीकडून असलेल्या अपेक्षांचे भान कायम राखले, तर माध्यमांचे समाजमनातील

स्थान कधीच ढळणार नाही, हे स्पष्ट आहे. मराठी वृत्तपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर या महान नेत्यांनी प्रसारमाध्यमाची ताकद ओळखली होती. प्रसारमाध्यम Media जनमत बनविण्याचे-बिघडविण्याचे एक प्रभावी माध्यम. लोकशाहीचा आधारस्तंभ सामान्य जनतेला आपली मते मांडण्यासाठीचे व्यासपीठ, राष्ट्रवाद जोपासणारे एक साधन, जगातील माहिती आपल्या घरापर्यंत आणणारा माहितीचा प्रचंड जनशक्ती असलेल्या या प्रसारमाध्यमांची खरी शक्ती आहे ती कमीत-कमी वेळात जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे अफाट सामर्थ्य या प्रसार माध्यमांकडे आहे. पण वेगळे सामर्थ्य अधिक तेवढी जबाबदारी अधिक वाढते. त्या सामर्थ्याचा काळजीपूर्वक, प्रगल्भतेने लोककल्याणासाठी वापर करण्याची सुज्ञता असावी लागते. सुदैवाने भारतातही या प्रसारमाध्यमांचा वापर याच सूज्ञतेने झाला. १९६२-१९६५ च्या युद्धासाठी केलेले आवाहन किंवा पूर्वेकडील राज्यांच्या पुराची स्थिती अशा सर्वच क्षेत्रातल्या बातम्या ही प्रसार माध्यमे आपल्यापर्यंत पोहोचावीत असतात.[2] लोकमताला आकार देण्याची कुवत ओळखून जगातील हुकूमशहांनी या माध्यमावर बंदी आणण्याचा प्रयत्न केला पण त्यांना जनक्षोभाला सामोरे जावे लागल्याचे इतिहास सांगतो.[3] भारतातही हा प्रयोग करून पाहिला गेला आणि परिणाम व्हायचा तोच झाला ! त्यानंतर मात्र या लोकशाहीच्या प्रमुख आधारस्तंभाला हात लावण्याचे धाडस कोणी केले नाही.कालाय तस्मै नमः' म्हणतात. त्याप्रमाणे प्रसारमाध्यमांतही बदल झाले. त्यांच्या स्वरूपात आणि गुणवत्तेतही! सुरुवातीला वर्तमानपत्र, रेडिओनंतर, दूरचित्रवाणी अशी रूप धारण केली गेली आणि गुणवत्ता ! प्रथम वैचारिक पातळीवर विहार करणारी ही माध्यमे मनोरंजनाचे साधन होऊ पाहत आहेत. परिणाम मसालेदार चटपटीत बातम्या देण्यासाठीची स्पर्धा! याही बातम्या 'सबसे तेज' देण्यासाठी स्पर्धा ! मग कुणा प्रसिद्ध व्यक्तीच्या आजारपणाला इतके महत्त्व की देशाच्या इतर समस्या त्यापुढे फिक्या वाटाव्यात.[4]

सध्याचे युग हे माहितीयुग आहे. आल्विन टॉफलर या विचारवंताने म्हटल्याप्रमाणे कृषी, औद्योगिक या दोन युगानंतर आलेल्या 'माहिती युगात' ज्ञान हीच खरी संपत्ती बनली आहे. त्यामुळे माहितीचे ज्ञानात रुपांतर करणारी माध्यमे व त्यातील पत्रकार हे माहिती युगातील अत्यंत महत्त्वाचे घटक बनले आहेत. त्यामुळे माध्यम क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत.

मागील तीन दशकात माध्यमांच्या क्षेत्राचा अफाट विस्तार झाला.[5] भारतात झपाट्याने विकसित होत असलेल्या क्षेत्रात माध्यम आणि रंजन क्षेत्राचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. वार्षिक 13.9 टक्के विकासदराने या क्षेत्राची वाढ होत असल्याने माध्यम व रंजन उद्योग क्षेत्रातील उलाढाल 2019 सालापर्यंत 2000 अब्ज रुपयापर्यंत जाईल असे अपेक्षित आहे.[6] यावरून या क्षेत्रातील वाढीचा धडाका आपल्या लक्षात येऊ शकेल.

माध्यमांचा अफाट विस्तार

भारतात आजच्या घडीला 70 हजार वृत्तपत्रे आणि 800 टेलिव्हिजन चॅनल्स आहेत. याशिवाय रेडिओ, सिनेमा, वेबपोर्टल, ऑनलाइन वृत्तपत्रे, मोबाइल न्यूज, इव्हेंट मॅनेजमेंट, सोशल मीडिया, जाहिरात, जनसंपर्क इत्यादी क्षेत्रेही विस्तारत आहेतच. त्याचबरोबर माध्यम संशोधन क्षेत्र, बाह्य प्रसिद्धी माध्यमे, प्रकाशन क्षेत्र, माहितीपट व चित्रपट क्षेत्र, जनसंपर्क क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, भारत सरकार व विविध राज्य सरकारांच्या माहिती व जनसंपर्क यंत्रणा, कॉर्पोरेट क्षेत्र, शासकीय कार्यालये यात पत्रकारितेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. त्यातील एक चांगली तर दुसरी वाईट असते. तसेच प्रसारमाध्यमांचेही आहे.[7]

परिणाम-

प्रथम आपण प्रसारमाध्यमांचे काही चांगले परिणाम पाहाणार आहोत. ते पुढीलप्रमाणे आहेत:

१) प्रसारमाध्यमांमुळे आपल्यापासून दूर असलेल्या व्यक्तींशी सहज संपर्क साधता येतो. उदा. दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट यांसारख्या साधनांचा वापर करून आपण जगातील कोणत्याही कोपऱ्यात राहणाऱ्या व्यक्तीशी पटकन व सहज संपर्क साधू शकतो. .

२) माहिती मिळविण्यासाठी व माहिती देण्यासाठी लागणारा वेळ व श्रम यांत बचत होते. उदा. या जलद संदेशवहन साधनांचा शोध लागण्यापूर्वी एखादा निरोप किंवा संदेश देण्यासाठी व्यक्तीला पाठविले जात असे. त्यात वेळ व श्रम खूप जात असे. किंवा टपालाने पत्र पोहोचायलाही बराच वेळ लागत असे. परंतु विविध संदेशवहनाची साधने उपलब्ध झाल्यामुळे वेळ व श्रम यात बचत होऊ लागली. संदेश पटकन पोहचविला जाऊ लागला.

संदर्भ -

1 गुणे दिनेश -माध्यमे संवादाचे साधन -21 जाने 2019

2 बेरार टाईम्स -आश्विन मुद्रल - २३ /04 /2019

3 प्रहार -12 /11 /2015

4 महाराष्ट्र टाईम्स-१९ /06 /2019

५ लोकसत्ता -15 /05 /2015

६ जनशक्ती -26 /11 /2018

7.Teams Ys Marathi- 16/10/2016